# माझे चौथे गुरु

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - संगीत कला विहार, संपा. बी. आर. देवधर, अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मिरज, सप्टेंबर १९७६)

प्रा. बा. र. देवधर - त्यांची शाळा तसे पाहिले तर आमच्या राहत्या जागेपासून जवळ पण तरीही त्यांच्याकडे मी पोचायला १९६९ साल उजाडले. विद्यापीठाच्या संगीतविभागासाठी अभ्यासक्रम तयार करत होतो. आवाज-जोपासना शास्त्राचा अभ्यासक्रम तयारही केला. पण समाधान नव्हते. कारण या विषयात केवळ पुस्तकी ज्ञान उपयोगी नाही. याची खात्री पटून मनात अस्वस्थता निर्माण झाली होती. देवधर मास्तरांचे नाव या विषयाच्या संदर्भातही ऐकून होतो. शिवाय संगीतविभागाच्या सल्लागार समितीत मास्तर होतेच. तेव्हा फारसा संकोच वाटण्याचे कारण नव्हते.

वेळ ठरवून गेलो. घर अंधेरे. चटईवर मास्तर काहीसे वाकून बसलेले चष्म्यातून वर बघत. हातातल्या तपकिरीच्या डबीची संगत सारखी. या बसा झाले. हळूहळू अधिकृत कामही संपले.
"तुमची नेमणूक झाली विद्यापीठात, बरे झाले. तुम्ही लिहिलेले वाचतो पण फारसे कळत नाही." मास्तर.
"माझे गाणे ऐकाल कां? माझ्या आवाजाच्या अडचणी आहेतच. पण मला हे शास्त्र काय ते नीट समजून घ्यायचे आहे. शिकवाल काय?" मी.
एक क्षणभर शांतता. थोडेसे रोखून बघणे. हा कितपत खरा आहे हे पाहण्यासाठी "मला काय? शिकवीन की" कांहीसे सावध थंड होकार. असे शिष्यपण चालू झाले आणि एकदा चालू झालेले शिष्यपण कधी संपत नाही. हे खंडित होते फार तर.

आवाज-जोपासना शास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात मास्तरांनी केली. बाकीचे आवाजाविषयी बोलताना मास्तरांनी ज्या वयात ज्या जिद्दीने इकडे लक्ष वळविले ते पाहता त्यांना धाडसीच म्हटले पाहिजे. मास्तर शिकून आले आणि मी त्यांच्याकडे शिकायला गेलो यात १५-२० वर्षांचे अंतर. अभ्यास एकट्याने होतो पण शिक्षणाला शिष्यही लागतो. जिज्ञासेने अधिकारी व्यक्ती आवाज-जोपासना शास्त्र शिकायला मास्तरांकडे गेली नाही. नवीन संपादलेल्या विद्येची कसोटी प्रश्नकर्त्यांत असते. नाहीतर ती विद्या वाढत नाही. मास्तरांनी या विषयावर लेख लिहिले, व्याख्याने दिली. पण एकंदरीने या विषयाची समकालीनांनी उपेक्षाच केली. हा विषय विनाकारणच बासनात गुंडाळून ठेवल्यासारखा झाला. मला मास्तरांनी सांगितले, "गायन-बियन तू कर. मला येतं तेवढं करून घेईन." तसेच त्यांनी केले. नीट व मन:पूर्वक करून घेतले. त्यांची गुरुगीता डॉ. स्टॅनलेचे पुस्तक. त्याबरहुकूम ते चालतात. एका विलक्षण प्रामाणिकपणाने आपले ज्ञान कुठे थांबले ते मान्य करून टाकीत शिक्षण दोन वर्षे चालू राहिले. माझ्या आयुष्यातल्या या गुरुपर्वातला पहिला अध्याय आवाज-जोपासना शास्त्राचा.

या अध्यायाचे वाचन-पठण चालू असतानाच मास्तरांकडे गायन शिकायलाही सुरुवात झाली होती. मी आधी गुरुवर्य गजाननबुबा जोशी, गानू मास्तर आणि लक्ष्मणराव बोडस यांच्याकडे शिकून मग मास्तरांकडे वळलेलो. पण तरीही मास्तरांचा खजिना असा की दररोज नवीन चीज निघत असे. नवीन चीज घेता घेता नवीन दृष्टी मिळण्याचा चमत्कारही घडू लागल्याचे माझ्या लवकरच लक्षात आले. मास्तरांच्या जुन्या-पान्या वह्या निघत. त्यात कोणत्या गवयाकडून केव्हा, कुठे, कशी चीज घेतली याची नोंद असे. का घेतली याची पुस्ती मास्तर स्वतः जोडत. चीजा ऐतिहासिक आणि चीजेला इतिहास असा प्रकार. गुंगून जाण्याशिवाय गत्यंतर नाही. एकच चीज निरनिराळ्या लोकांकडून घेऊनही त्यावर पुन्हा सिंदेखांची छाप असे. तेव्हा 'मास्तरांसाठी सिंदेखां हे चिंतामणी होते', असे

म्हणण्यास हरकत नाही. मास्तर स्वतः चीज अप्रतिम म्हणतात. सहजता, प्रवाहीपणा, जिवंतपणा, नखरा, शब्दांचे भान, अर्थाचा मान, रागाला किंचित् धक्का देण्याचे कसब असे अनेक गुण. ताल मास्तरांना फारसा आवडत नाही आणि मैफल असली तर मास्तर जादा गंभीर होतात. गवयांची, मर्मज्ञांची, चाहत्यांची छोटेखानी बैठक हे त्यांचे माध्यम. मग ऐकत राहावे, बघतही राहावे. मिरजेकाठचा हा ब्राह्मण म्हणता म्हणता 'कोरमे की खुशबू' देत देत गायला लागतो. विश्वासाने चीजांवर चीजा समोर उलगडल्या जातात. त्यांतल्या 'असर' करणाऱ्या जागा हुकमीपणे व सफाईने घेतल्या जातात. रागांची चर्चाही सूत्ररूपाने पण अधिकारवाणीने केली जाते. मास्तर खरे 'शो-मन' पण आहेत! श्रोते असताना त्यामुळे अनेकदा जास्त गोष्टी समजून जातात. दाद घेतघेत मास्तर पुढे सरकतात. मास्तरांकडे शिकणे हा एक रम्य अनुभव आहे. मी त्यांना एकदा म्हटले, "मास्तर मी अशा वेळेला तुमच्याकडे आलो की जेव्हा रोजगाराची धावपळ वेळ आणि शक्ती खाऊ लागली आहे."

मास्तर काही काही वेळा थंडपणे खरे बोलतात. ते म्हणाले, "आधी आला असतास तर मी काय देतो आहे त्याची किंमत कळली असतीच असे नाही." खरेही असेल. शिकल्यानंतरचे शिक्षण मास्तरांकडे घ्यावे. नसेल तिथे रुजविण्याचे काम अधिक जिकिरीचे व कंटाळवाणे - मास्तरांच्या प्रकृतीस ते मानविणारे नसावे. असलेल्याला देखणे करणे हे काम मात्र हरखून जावे इतक्या नेटकेपणे आणि मार्मिकतेने मास्तर करतात. त्यांचे शिक्षण 'गाऊ देण्यावर' आधारित. 'असेच गा' असे कधी त्यांनी आग्रहाने म्हटले नाही. मी चीज घेई. नोटेशन करून. घरी जाऊन ती सोडवीत बसे. मग कधी तरी त्यांच्यासमोर वा आकाशवाणीवर गाई. "पटले का हे अर्थ लावणे?" मास्तरांना मी विचारी. मग अनाग्रहीपणे, उदाहरण देत मास्तर विश्लेषण करीत. त्यांनी किती व किती बारकाईने ऐकले आहे याची साक्ष त्यांच्या डोळ्यात पटे. गुरुने वाट दाखवावी, आईने बोट धरून न्यावे, पित्याने डोळे वटारावे व बक्षीसही द्यावे अशी काहीतरी कल्पना त्यांच्या मनात असावी. मास्तरांनी आपली सर्व विद्या मला दिली असे म्हणण्याचे धाडस कसे करू? मागे एकदा प्रख्यात तबलावादक पं. विनायकराव घांग्रेकर मला म्हणाले होते, "सर्व देत नाही तो गुरु आणि त्यासाठी धडपडतो तो शिष्य हे लक्षात ठेव!" आम्ही दोघेही या न्यायास पात्र ठरणार असे दिसते!

याच काळात मास्तरांनी लिखाणही बरेच केले. "गायनाचार्य पं विष्णु दिगंबर", "थोर संगीतकार" ही पुस्तके प्रसिद्धही झाली. आवाज-जोपासना शास्त्रावरचे हस्तलिखित छपाईच्या वाटेवर आहे. संगीतातील मध्ययुग, १९ वे शतक व २० वे शतक यांना सांधणारा दुवा म्हणजे मास्तर. शिक्षण, राहणी, विचार आणि विद्या या बाबतीत मध्ययुगात वावरणाऱ्या गवयांना देशाच्या कानाकोपऱ्यात जाऊन मास्तर भेटले, त्यांची चरित्रे त्यांनी पारदर्शकपणे लिहिली, त्यांच्या चीजा परीक्षून नीटपणे घेऊन मास्तरांनी लिपिबद्ध केल्या. २० व्या शतकाचे ऊन मिळालेले हे कलावंत आज किती मोठ्या परंपरेतले दुवे म्हणून कार्य करीत आहेत हे मास्तरांच्या लिखाणाशिवाय लक्षात येणे अवघड गेले असते. आमच्याकडे इतिहासाची लिखित परंपरा नाही. मौखिक परंपरेने वेदापासून संगीतापर्यंत सर्व काही संभाळले गेलेले. गवयांच्या हकीकती इतिहासाची दुय्यम साधने म्हणून तरी नक्कीच महत्त्वाच्या. ही साधनसामुग्री आज जमविणे शक्य झाले नसते. देवधर मास्तरांचे पारदर्शी आणि 'स्व' नसलेले लिखाण म्हणूनच अर्थपूर्ण. लिखित परंपरेच्या विशेषणबाजीचा, संकेतबद्ध गौरव वा टीकेचा स्पर्श होऊ न देता त्यांनी मौखिक परंपरेला मुद्रितरूप दिले ही कामगिरी भविष्यात महत्त्वाची वाटेल इतकेच नव्हे तर तशी ठरेलही. आवाज-जोपासना शास्त्रावरील मास्तरांचे पुस्तक तर या विषयावरील भारतीय भाषांतले पहिले गंभीर विचार करायला लावणारे पुस्तक आहे. अशिक्षिताचे गैरसमज, सुशिक्षितांचा टिंगलखोरपणा आणि समव्यावसायिकांचा सहानुभूतिशून्य दृष्टिकोण यांना तोंड देऊन मास्तरांनी ज्या विषयाचा अभ्यास केला त्यावरील पहिले पुस्तक त्यांचे असावे यांत एक दैवी न्याय आहे. मास्तरांनी नवीन विषयाचा शोध घेतला आहे पण कुठेही संशोधकाचा आव आणलेला नाही. जेव्हा माणसे आठवणीत दंग होतात, झालेल्या स्तुतीचे पाढे चघळत असतात आणि निंदेच्या शंकेनेही चवताळत असतात अशा वयस्कर अवस्थेत मास्तरांनी नवीन विषयाला सामोरे जायचे धाडस पार पाडले. प्रारंभकाची सारी सुखदुःखे त्यांनी पाहिली.

मास्तरांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक पैलू आहे - पं. विष्णु दिगंबरांपासून वारसा मिळालेला - संघटनाकौशल्याचा. संगीताविषयी लिखाण करणे अपूर्वाईचे वाटावे अशा काळात संगीत कला विहारासारखे मासिक पाव शतकापर्यंत चालवायचे; संगीतकारांनी आपापले गट म्हणजे शत्रूविरुद्ध लढवायचे गड मानावे अशा काळात अखिल भारतीय स्वरूपाची गांधर्व महाविद्यालय मंडळासारखी संस्था ठाम उभी करावयाची; सरकारी आणि निमसरकारी गोटात संगीतकारांची गाऱ्हाणी न्यायची तर संगीतकारात शासकीय शिस्तीचे वारे आणून सोडावयाचे - या साऱ्याचे महत्त्व नोंदण्यासारखे आहे. संगीतात पूर्वी 'राजकारण' होते पण विसाव्या शतकात त्याचे 'संस्थाकारण' होणे जरूर होते. या स्थित्यंतराचा घाट मास्तरांनी यशस्वीपणे घातला. याचे फायदे व तोटेही मिळत राहणार हे उघड आहे. पण फायदे अधिक होतील हे विचारान्ती लक्षात येईल.

संगीत, संगीत शिक्षण, संस्थाचालन या पलीकडे मास्तरांना काही आवडते का? (अर्थात् तपकिरीशिवाय!) मला वाटते पैसा आणि वाचन. आपली काळजी म्हातारपणी कोण घेणार हे मानवी मनाला भेडसाविणारे सत्य. त्यामुळे असेल पैशाची ओढ. पण आणिही एक कटु अनुभव यामागे असावा. विद्येपेक्षाही अनेकवेळा पैशाला मान दिला जातो हे मास्तरांना जाणविल्याखेरीज राहिले नसावे. पं. विष्णु दिगंबरांनी तपामागून तपे फुकटसुद्धा विद्या दिली पण शेवटी त्यांनी उभारलेली वास्तु लिलावात निघाली! याचा एक अर्थ पैशाचे पाठबळ नाही हा होता. मास्तर एकदा म्हणाले, "मी काहीही फुकट घेतले नाही. दर चीजेला पैसे मोजले. कारण दिले व घेतले याची जाणीव पैशाइतकी कशामुळेच होत नाही." असेलही खरे. प्रत्येकाचे अनुभव वेगळे आणि त्या अनुभवांचे अर्थ लावण्याचे संकेतही निरनिराळे. प्रत्येकजण एकएक भूमिका पार पाडत असतो. त्या त्या वेळेस मनोभूमिका काय असावी याचा अंदाज घेतल्यास माणसाचा अर्थ लावणे सुलभ जाते. मास्तरांनी पैशाला 'मूल्य' मानण्यामागे कारणे असू शकतील. काही समजण्यासारखी, काही न समजण्यासारखी.

मास्तरांचे वाचन मजेशीर आहे. म्हणजे असे की आपल्या अपेक्षेपेक्षा वेगळ्याच विषयात मास्तर रमतात. उदाहरणार्थ इतिहास, आत्मचरित्रे आणि इस्राएलवरची पुस्तके मास्तर नेटाने वाचतात. बाकी मग हलके फुलके. नाटके वेळ जावा म्हणून पाहतात. सिनेमात फारसा रस नाही. प्राध्यापक न होता प्रोफेसर झालेल्या मास्तरांच्या वाचनात शिस्त नाही पण स्वतःचे असे तर्कशास्त्र आहे. कल्पनारम्य लिखाणापेक्षा फॅक्च्युअल त्यांना अधिक आवडते.

खरे म्हणजे मास्तरांनी आता आत्मचरित्र नाही तरी आठवणी तरी लिहाव्या. समाजाच्या विविध थरात संगीताचा शिरकाव होण्याच्या कालखंडात राजे-महाराजे, राजकीय पुढारी, पेशेवर गायक-गायिका आणि चित्रपट क्षेत्रातील हरहुनरी व्यक्ती, ब्रिटिश आणि भारतीय सनदी नोकर, इ. अनेक वर्गातील व्यक्तींशी त्यांचा संबंध आला. परदेशच्या वाऱ्या झाल्या तेव्हाचा काल लक्षात घेता या दौऱ्यातही वेधकपणा असणारच. मास्तरांचे एक आवडते पुस्तक म्हणजे 'द स्टोरी ऑफ सॅन मिशेल.' ॲक्सल मुंथ या लेखकाच्या बहिणीशी मास्तरांची प्रत्यक्ष ओळख. या डॉक्टराने जितक्या मोकळेपणे पुस्तक लिहिले तसेच मास्तरांनी लिहिले तर फार वेधक काहीतरी हाती लागेल यापेक्षा मर्यादशील काय सुचवणार?

मास्तरांची पिढी भावना व्यक्त करणे म्हणजे बायकी वर्तणूक करणे असे मानणारी. यामुळे मास्तर कधी गहिवरलेले, भावविवश झालेले दिसत नाहीत. तरीही काही काही व्यक्तींबद्दल बोलताना त्यांना हललेले मी पाहिले आहे. प्रो. स्क्रिंझी, बड़े गुलामअली, कुमारगंधर्व आणि - सिंदेखां या त्या व्यक्ती. ही यादी नीट पाहण्यासारखी. गुरु, भाई, शिष्य या तीनच नात्यांचे प्रतिनिधि तीत दिसतात! याचा अर्थ काय लावायचा? अर्थ एकच मास्तरांचे सर्व लागेबांधे संगीतातले हा तो अर्थ.

---